शहराच्या मध्यवर्ती भागात
नवीन फ्लॅट्स विकणे आहे

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७
एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



मंगल कार्यालय

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.
सौभाग्य मंगल कार्यालय
आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, मो.: ९०९६९६६२२२



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २०९ वा | बुधवार, दि. २६ मार्च २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापुरात जिजाऊ रथयात्रेचे जोरदार स्वागत

## बहुजन समाजाला एकत्र करणे हाच उद्देश – सौरभ खेडेकर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यभर जिजाऊ रथ यात्रेच्या माध्यमातून आपण दुरावत चाललेला बहुजन समाज एकत्र करण्याकरिता कार्य करत आहोत. मराठ्यासह बहुजनामधील तरुण दंगलीकडे न वळता तो स्वतःच्या उद्योगाकडे वळला पाहिजे हा मराठा सेवा संघाचा मूळ उद्देश आहे त्या उद्देशापासून आत्ताचा तरुण वर्ग दुरावत चालल्यामुळे ही रथयात्रा काढण्यात आली असल्याचे मत मराठा सेवा संघाचे सौरभ खेडेकर यांनी व्यक्त केले.

जिजाऊ रथयात्रा 2025 मराठा जोडो अभियान, या निमित्ताने चार पुतळा येथेआयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते.

यावेळी बोलताना अर्जुन तनपुरे म्हणाले की, आम्ही जी काही रथयात्रा काढली ती कुठल्या निवडणुका आमच्या डोळ्यासमोर नाहीत. निवडणुका असल्याचा काही कारण नाही. ही रथयात्रा यासाठीच काढली की मराठा सेवा संघ मधल्या काळामध्ये म्हणजे मराठा सेवा संघच नाहीत तर ज्या काही बहुजन समाजाच्या संघटना आहेत त्या संघटनेमध्ये थोडी शिथिलता आलेली आहे. त्यामुळे शत्रू प्रबळ होत आहे. आणि म्हणून मागच्या दोन वर्षांमध्ये विविध प्रश्न महाराष्ट्रामध्ये





उभे राहत आहेत. बहुजन समाजाच्या महापुरुषांची बदनामी, असे विविध प्रश्न निर्माण करून कुणाची हत्या झाली तर त्याच्यावर जातीय तेड निर्माण करून समाजामध्ये भांडण लावून दंगल परिस्थिती निर्माण करणे हा हेतू ठेवून जे काही मूळ प्रश्न आहेत त्याला बदल देऊन या समाजामध्ये कशी धुई निर्माण याचा प्रयत्न मागच्या दोन-तीन वर्षांमध्ये तर जास्त प्रमाणावर सुरू आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष जी.के देशमुख यांनी केले.

जिजाऊ रथयात्रेत उद्योगपती दत्तात्रेय मुळे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष जी.के देशमुख, किरण घाडगे, सूर्यकांत पाटील, अतुल धुमाळ, सोमनाथ राऊत, अविनाश गोडसे, आंबादास रेडे, गणेश निळ, रामचंद्र पाटील, मनोज गायकवाड, उत्तमराव माने - शेंडगे, सचिन गुंड, पांडुरंग सुरवसे, राजन जाधव, माऊली पवार, गणेश देशमुख, प्रकाश ननवरे, प्रशांत पाटील, सदाशिव पवार, हनुमंत पवार, विजय पोखरकर, संजय जाधव, उज्वला साळुंखे, मनीषा नलावडे, लता ढेरे, लता फुटाणे, अभिंजली जाधव, स्मिता ताटे, लक्ष्मी माने स्वाती पवार, निर्मला शेळवणे, अश्विनी भोसले, गणेश माळी, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल, काँग्रेसचे विनोद भोसले, गणेश डोंगरे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, भाजपचे हेंमत पिंगळे, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बरडे यांच्यासह मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेड, हिंदू रक्षक लेझीम संघ, वारकरी मंडळ कामती याच्यासह नागरिक उपस्थित होते.

यावेळी शाहीर राजेंद्र कांबळे यांच्या पोवाड्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

# प्रशांत कोरटकरची तीन दिवस पोलिस कोठडीत रवानगी

## संतप्त शिवप्रेमींना चकवा देत न्यायालयात केले हजर

**कोल्हापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करून इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकावणाऱ्या प्रशांत कोरटकरला न्यायालयाने तीन दिवस पोलिस कोठडी सुनावली. तेलंगातून ताब्यात घेतल्यानंतर कोरटकरला घेऊन पोलिसांचे पथक आज, मंगळवारी सकाळी कोल्हापुरात पोचले. यानंतर त्याला न्यायालयात



हजर केले असता २८ मार्च पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

प्रशांत कोरटकर याला जुना राजवाडा पोलिसांच्या पथकाने काल, सोमवारी दुपारी तेलंगणातून अटक केली. रात्रभर प्रवास करून आज, मंगळवारी सकाळच्या सुमारास पोलिसांचे पथक कोल्हापुरात पोहोचले. यावेळी जुना राजवाडा पोलीस ठाण्यासह कसबा बावडा येथील जिल्हा न्याय संकुलाबाहेर पोलिसांनी बंदोबस्त तैनात केला होता.

संतप्त शिवसैनिकांनी न्यायालय परिसरात गर्दी केली होती. त्यामुळे हल्ला होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी बंदोबस्त वाढवून खबरदारी घेतली होती. पोलिसांनी सर्वांनाच चकवा देत लपून छपून कोरटकरला न्यायालयात हजर केले. कोरटकरला न्यायालयात हजर करण्याआधीच शिवप्रेमींनी आक्रमक होऊन कोल्हापुरी चप्पल अन् चिल्लर उधळून निषेध केला. तसेच काही शिवप्रेमींनी त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. आक्रमक झालेल्या शिवप्रेमींना पोलिसांनी ताब्यात घेतले.

# मीच हिंदू धर्म वाचवू शकतो असं एका नेपाळ्याला वाटतं

## अनिल परब यांचा सभागृहात हल्लाबोल

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** हिंदू धर्म वाचवण्यासाठी आम्ही समर्थ आहोत, पण ते करत असताना दुसऱ्याच्या धर्मावर आम्ही जाणीवपूर्वक अन्याय करणार नाही, तशी आम्हची शिकवण आहे असं शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब म्हणाले.

विधान परिषदेत बोलताना त्यांनी मंत्री नितेश राणे यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली. महाराष्ट्रात एक नेपाळी आहे, त्याला वाटतंय की मीच हिंदू धर्म वाचवू शकतो असा टोला अनिल परब यांनी लगावला. जाती-जातीत आणि धर्मांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न राज्यात केला जात आहे असा आरोपही त्यांनी केला. विधान परिषदेत अनिल परब बोलताना त्यांच्या शेजारी उद्धव ठाकरे उपस्थित होते.



**हा नेपाळी अंगावर शाल घेऊन फिरतोय**

अनिल परब म्हणाले की, "हल्ली काय झालं आहे की मांसाहार खायचं नाही असं कोणीतरी म्हणतं. त्यांना हा अधिकार कुणी दिला? मटण कोणतं खायचं, झटका मटण खायचं की हलाल खायचं हे तुम्ही सांगणार का? एक मंत्री सांगतो आपण काय खायचं आणि काय खायचं नाही. राज्यात हिंदू मुस्लिम वाद होतील असं वातावरण आहे. माज्या सोसायटीत नेपाळी वॉचमन आहे तो रात्रभर ओरडत असतो जागते राहतो. त्याला वाटत त्याच्यामुळे आम्ही सुरक्षित आहे. पण तसं नाही. सध्या असंच एक नेपाळी अंगावर शाल घेऊन फिरतोय आणि मीच हिंदू धर्म वाचवू शकतो असं सांगत आहे. पण हिंदू धर्म वाचवायला आम्ही समर्थ आहोत."

आपल्याला जगायचं कसं, बोलायचं काय, राहायचे कसं यावर घटना भाष्य करते. मला बोलण्याच स्वातंत्र्य मिळाल आहे. पण हे स्वातंत्र्य मिळालं म्हणून मी काहीही बोलू शकत नाही. सध्या असं होतं नाही. आता कोणीही उठतंय, देवाची विटंबना कर, महापुरुषांची विटंबना कर असा प्रकार सुरू आहे असं अनिल परब म्हणाले.

**आम्हाला निधीच दिला जात नाही**

अनिल परब म्हणाले की, "निधीच समान वाटप हा घटनेने दिलेला अधिकार आहे. केंद्र सध्या राज्याच्या बाबत निधी वाटपात दुजाभाव दाखवत आहे. आता राज्यात सुद्धा असाच प्रकार सुरू झाला आहे. माज्या मतदार संघात 100 कोटी रुपयांच्या वर्क ऑर्डर दिल्या गेल्या. आता त्याठिकाणी निधी दिला जात नाही. आम्ही काम करायचं नाही का? एका वॉर्डात निधी दिला जातो आणि दुसऱ्या वॉर्डात निधी दिला जात नाही."

(पान 2 वर..)

# एसटीचे चालक-वाहक ओळखपत्रासह गणवेशात नसतील तर होईल कारवाई

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) चालक. वाहकांसाठी गणवेश, नेमप्लेट व बेंज-बिल्ला बंधनकारक केला आहे. मात्र, याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे चालक आणि वाहक कोण, हे कळणे प्रवाशांनाही कठीण जाते; परंतु तपासणीदरम्यान कर्मचारी आढळले, तर त्यांच्यावर दंडाची कारवाई करण्यात येते.

वाहक-चालकांनी कर्तव्यावर असताना मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार गणवेश धारण करूनच कामगिरी करणे आवश्यक आहे; परंतु काही कर्मचारी कामगिरीवर असताना मोटारवाहन कायद्यातील तरतुदीप्रमाणे विहित गणवेश परिधान करत नाही.

**२६६ वाहक, ३४३ चालक**

चंद्रपूर जिल्ह्यात चार आगार असून त्यात ३४३ चालक, १५३ चालक कम वाहक आणि १५० वाहक कार्यरत आहे. काही कंत्राटी कर्मचारीसुद्धा नेमले आहेत.



चंद्रपूर एसटी आगारात पाहणी केली असता. येथे ये-जा करणाऱ्या चालक, वाहकाच्या अंगावर गणवेश दिसून आला, तसेच काहींचा बिल्ला, नेमप्लेटही दिसत होते; परंतु काहींनी त्याचे पालन केले नसल्याचे पाहणीत दिसून आले आहे.

**आगार व्यवस्थापकांना सूचना**

प्रत्येक वाहक आणि चालकांनी स्वच्छ गणवेश परिधान केलेला असावा. त्यांच्या गणवेशावर बिल्ला, नेमप्लेट, बेंज असावा, जेणेकरून प्रवाशांनाही त्याची माहिती होऊन एखाद्या वेळेस चालक किया वाहकाकडून गैरवर्तन झाल्यास त्यांना तक्रार करणे सोईचे ठरेल, त्या अनुषंगाने आगार व्यवस्थापकांना सूचना देण्यात आल्या आहे.

**बिल्ला, गणवेश, नेमप्लेटचा वापर होतो का?**

प्रत्येक एसटीच्या वाहक आणि चालकाच्या अंगावर गणवेश, बिल्ला, नेमप्लेट असावे, असा नियम आहे. त्यानुसार बहुसंख्य आगारांतून चालक, वाहक याचे पालन केल्याचे दिसते.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नावर संसदेत प्रणिती शिंदे आक्रमक

**नवी दिल्ली, (वृत्त सेवा):-** सोलापूर लोकसभेच्या खासदार प्रणिती शिंदे या संसद अधिवेशनातील प्रश्नोत्तरांच्या सत्रामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक होऊन सरकारला धारेवर धरले यावेळी आपले विचार व्यक्त करताना देशात शेतकरी शेती का सोडत आहेत हे त्यांनी संसदेच्या समोर आणले. पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रात तीस हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. शेतकरी आंदोलनात सातशे पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. हे संसदेच्या निदर्शनास आणून देत असताना माझा माईक बंद केला गेला. आज देशात आणि महाराष्ट्रात प्रधानमंत्री फसल बिमा योजना कंपन्या मनमानी करत आहेत, वेळेवर पंचनामे होत नाही, पाऊस झाला नाही म्हणून कंपन्या सांगतात, अतिवृष्टीमुळे झालेली नुकसान भरपाई मिळत नाही, दुधाला दर, शेतीमालाला हमी भाव नाही,



साखर कारखान्यांकडून उसाचे बिल वेळेवर दिले जात नाही, शेतकऱ्यांना कर्ज दिले जात नाही, पी.एम. किसान योजनेच्या माध्यमातून अतिशय तुटपुंजे मदत दिले जाते त्यात खताचे पोते तरी येते काय? असा सवाल केला.

भाजप सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत आल्यामुळे शेतकरी अडचणीत येऊन आत्महत्या करत आहेत. यावर उपाययोजना न करता भाजप सरकार शेतकऱ्यांवर जाणूनबुजून अन्याय आणि अपमान करत आहेत. आणि शेतकऱ्यांचे प्रश्न संसदेत मांडत असताना माईक बंद करून आमचा आवाज दाबला जातोय.


दैनिक सोलापूर कटूसत्य www.katusatya.in katusatya@gmail.com
मुख्य कार्यालय
संपादक पांडूरंग हरिदास सुरवसे
उपसंपादक सचिन मोहन जाधव
सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५९२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३१०३३९

## आपणही होवू शकता ''मुक्त पत्रकार''

नमस्कार....,

आपणही ''मुक्त पत्रकार'' होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक ''मुक्त पत्रकार'' होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक ''कटूसत्य'' या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 0020011120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि ''मुक्त पत्रकार'' होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये ''मुक्त पत्रकार'' म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) ''मुक्त पत्रकार'' मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर ''मुक्त पत्रकार'' म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती ''मुक्त पत्रकार'' म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे ''मुक्त पत्रकार'' झाल्यानंतरच आपल्या जाहीराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच ''मुक्त पत्रकार'' होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू
सपादक दै.सा.कटूसत्य

टिपः- ''कटूसत्य'' व ''वृत्तदर्पण'' या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.


# मराठा-बहुजन समाजाने एक होऊन नव्या उमेदीने पुढे जावे : खेडेकर

## कुर्डूवाडीकरांनी केले जिजाऊ रथयात्रेचे जल्लोषात स्वागत

**कुर्डूवाडी (कटूसत्य वृत्त):-** बटेंगे तो कटेंगे हे मराठा आणि बहुजन समाजालाही लागू होते त्यामुळे मराठा आणि बहुजन समाजाने एक होऊन नव्या उमेदीने पुढे जावे असे प्रतिपादन संभाजी ब्रिगेडचे प्रदेश महासचिव सौरभ खेडेकर यांनी मराठा सेवा संघ संचलित जिजाऊ रथयात्रेच्या कुर्डूवाडीतील सभेत बोलताना केले.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे ही मराठा सेवा संघाची १९९१ पासूनची मागणी आहे.तो लढा कायम ठेऊन आर्थिक निकषावरील १० टक्के आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी युवकांनी प्रयत्न करावा. समाजातील युवकांनी उद्योगशीलता वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मराठा आणि बहुजन समाजाने एकीने,शांततेने राहून आपली प्रगती केली पाहिजे,युवकांनी भावनिक होऊन आपले आयुष्य बरबाद करू नये, समन्वयाची, समतेची शांततेची जी





परिस्थिती महाराष्ट्रात होती ती पुन्हा आणणे गरजेचे आहे. ज्या ज्या देशात धर्मांधता आहे ती राष्ट्रे तळागाळाला गेली आहेत, त्यामुळे आपल्या बहुजन समाजाने एकीने,समन्वयाने शांततेने राहून आपली वैयक्तिक, सामाजिक प्रगती करणे गरजेचे आहे, मराठा - बहुजन समाजाने विवाहावरील अनावश्यक खर्च टाळावेत, खर्च वाचविणे हे सुद्धा एक उत्पन्न असते, असे सौरभ खेडेकर पुढे म्हणाले.

मराठा सेवा संघाच्या वतीने संस्थापक-अध्यक्ष पुरूषोत्तम खेडेकर यांच्या संकल्पनेतून पंजाब, सिंध, गुजरात, मराठा या राष्ट्रगीतातील ओळीप्रमाणे अठरापगड जातीतील मराठा आणि बहुजन समाजबांधवांना एकत्रित करण्यासाठी मराठा सेवा संघाच्या वतीने मराठा जोडो अभियान राबविण्यात येत आहे.संपुर्ण महाराष्ट्रभर मराठा जोडो अभियान राबवण्यात येत असून, या निमित्ताने जिजाऊ रथयात्रेचे सोमवारी सायंकाळी कुर्डूवाडी शहरात आगमन झाले. संपूर्ण शहरातून रथयात्रेची मिरवणूक काढण्यात आली. चौकाचौकात जिजाऊ रथयात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात जाहीर सभा झाली. यावेळी विचार पिठावर संभाजी ब्रिगेडचे प्रदेश महासचिव सौरभ खेडेकर, माजी आमदार विनायकराव पाटील,मराठा सेवा संघाचे राज्याचे मार्गदर्शक प्रा.अर्जून तनपुरे, उत्तमराव माने, संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक मनोजकुमार गायकवाड, दिनेश जगदाळे, जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, जिजाऊ ब्रिगेडच्या निता खटके, शिवसेना महिला आघाडीच्या आशाताई टोणपे, भा.ज.प.महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा प्रतिक्षा गोफणे, आशाताई मोरजकर, मनिषा गाडे, प्रफुल्लता मोहिते, अश्विनी गोरे, अरूणा पाटील, उमाकांत उफाडे, नितीन खटके, आनंद काशीद, तात्यासाहेब पाटील, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष अमित निमकर, तालुकाध्यक्ष निलेश देशमुख, अरूण जगताप, सर्जेराव बागल, मधुकर भोसले, सुरज मोहिते उपस्थित होते.

यावेळी प्रा.अर्जून तनपुरे, मनोजकुमार गायकवाड, सचिन जगताप, हर्षल बागल, आशाताई टोणपे, प्रतिक्षा गोफणे, सचिन काळे यांची भाषणे झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुहास टोणपे, संदेश बागल, तुकाराम भोसले, सचिन महिंगडे, शिवाजीराव गवळी, बाळासाहेब वागज, शंकर नागणे, सतिश महिंगडे, प्रमोद बागल, सौरभ भोसले, प्रशांत बागल, नवनाथ कडबाने, निलेश गवळी यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन उपाध्यक्ष मेजर अरूण जगताप यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुधीर क्षीरसागर यांनी केले.

## संपादकीय

# लक्ष्मणरेषा असावी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची थट्टा करणे स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याला अडचणीचे ठरलेले दिसते. शिंदे समर्थकांच्या रोषाचा सामना मात्र मुंबईतील हॅबिटॅट स्टुडिओला करावा लागला. रविवारी सायंकाळी शिवसैनिकांनी एका हॉटेलमध्ये तोडफोड केली, तर सोमवारी बृहन्मुंबई महापालिकेच्या कर्मचार्‍यांनी स्टुडिओचा काही भाग पाडला. गेल्या काही दिवसांत एकट्या महाराष्ट्रात स्टँडअप कॉमेडियन जमात गोत्यात येण्याची ही तिसरी घटना आहे. यातील अगोदरच्या एका प्रकरणात एका अभिनेत्याची गंमत केल्याबद्दल कॉमेडियनवर हल्ला झाला होता, तर दुसरे एक इंडियाज गॉट लेटंट प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले. अगोदरच्या दोन प्रकरणांपेक्षा कामराचे प्रकरण काहीसे वेगळे आहे. त्याने विद्यमान राजवटीतील एका मोठ्या नेत्याची खिल्ली उडवण्याचा प्रयत्न केला आहे. त्या अनुषंगाने पुन्हा एकदा मत मांडण्याचे स्वातंत्र्य आणि लोकशाही आदी मुद्दे चर्चेला आले आहेत व त्याची चर्चा होतच राहील. या पलीकडे जाऊन आणखी एक विषय आता चर्चेला येणे आवश्यक आहे की कॉमेडी करणार्‍यांनी लक्ष्मणरेषा ओलांडावी का? त्यांना वैगुण्यावर बोट ठेवण्याचा अधिकार निश्चितच दिला आहे व त्याचा ज्याच्यात धाडस असेल त्यांनी वापर केलाही पाहिजे. मात्र, असे व्यक्तिगत हल्ले करण्यामागे कोणता अंतःस्थ हेतू आहे का? एका गाजलेल्या चित्रपटातील गाजलेल्या गाण्याचे विडंबन कामराने सादर केले. त्याने एकनाथ शिंदे यांचे नाव घेतले नसले, तरी रोख त्यांच्याकडेच होता.

शिवसेनेत फूट पडल्यानंतर शिंदे यांच्या गटावर मूळ पक्षातील नेत्यांकडून ज्या शब्दांचा वापर करत गेले दोन-तीन वर्षे हल्ला केला जातो आहे त्या शब्दांचा वापरही केला गेला व त्यामुळे शिंदेंच्या समर्थकांनी भडकणे स्वाभाविक होते. तोडफोड झाली, महापालिकेकडून कारवाईही झाली. स्टुडिओनेही कामराच्या व्हिडिओतील विचारांचे आम्ही समर्थन करत नाही, असे नमूद करत बिनशर्त आणि मनापासून माफी मागितली आहे. राजकीय पटलावर हा विषय हॉट ठरला आहे तद्वतच सोशल मीडियावर यासंदभार्तील बाजू आणि प्रतिबाजू मांडर्णायांच्या पोस्टस्चा महापूर आला आहे. थोडक्यात, अशा घटना घडल्यानंतर जे जे होणे अपेक्षित असते ते सगळे होते आहे.

राज्याचे मुख्यमंत्री, दुसरे उपमुख्यमंत्री यांनीही कामराचा निषेध केला असून माफी मागावी असे त्याला सुनावले आहे, तर शिंदेंनी ज्या पक्षाला भगदाड पाडून आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले होते त्या मूळ पक्षाच्या प्रमुख मंडळींनी उघडपणे कामराचे समर्थन केले आहे. हा वाद इतक्यात थांबणार नाही. कामरा यानेही अगोदर न्यायालयाने आदेश दिले, तर माफी मागू असे म्हटले होते. नंतर त्याने पुन्हा घुमजाव केल्याचे समजते. याचा अर्थ त्याला आता भय नसल्याचे त्याने सूचित केले आहे. त्यामुळेच याला कोणी सुपारी दिली का किंवा कसला लाभ दिला गेला आहे का या चर्चांनाही जोर आला आहे. त्याचा त्याने इन्कार केला आहे. लोकशाहीत भाषणस्वातंत्र्य आहे. तसेच जो स्थिरावला असतो आणि त्यामुळे काहीसा बेफिकीरही असतो त्याला डिवचण्याचा अधिकारही माध्यमांना असतो. त्यामागे व्यापक समाजहिताचा हेतू असतो. नवमाध्यमांना मात्र स्वातंत्र्य आणि जबाबदारी यातील लक्ष्मणरेषा ओळखावी लागेल. देशात सगळीकडे ठराविक काळानंतर अशा घटना घडत आहेत. तमिळनाडूपासून पश्चिम बंगालपर्यंत आणि मुंबईपासून दिल्लीपर्यंत कोणीतरी कलाकार किंवा विद्वान त्याच्या अंगभूत गुणांमुळे असे वातावरण तापवतो. बर्‍याचदा यात मुख्य प्रवाहातील माध्यमे अर्थात प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया यांचा असल्या एककल्ली किंवा एकलक्ष्यी पेटवापेटवीत सहभाग नसतो. या माध्यमांची आणि त्यात काम करणार्‍यांची काही धोरणे असतात आणि त्यांना आचारसंहिता असते. कुठला विषय आक्रमक स्वरूपात मांडणे आवश्यक आहे आणि कुठल्या विषयावर फार चर्चा होणे अहितकारी आहे याचे त्यांना भान असते. काही बाबी ते कटाक्षाने टाळतात आणि अगदी शिशुपालासारखे ज्याचे शंभर अपराध झालेले असतात त्याच्यावरच ते व्यक्तीकेंद्रित हल्ले करतात. एरव्ही त्यांची टीका प्रामुख्याने व्यवस्थेवर, धोरणांवर आणि विचारांवर असते. नवमाध्यमांना असले बंधन नाही. त्याचे कारण ही माध्यमे चालवणारे किंवा हाताळणारे हे त्या माध्यमातील पहिली पिढी असते. कोणाकडून त्यांना वारसा परंपरेने किंवा गुरूशिष्य परंपरेने ते माध्यम मिळालेले नसते. त्यामुळे माध्यम हाती आले आणि त्यात प्रशंसा करणार्‍यांचा आणि आपल्यापेक्षाही आपल्या म्हणण्याला अधिक आक्रमक शब्दांत समर्थन करणार्‍यांचा गट याच माध्यमाच्या माध्यमातून मिळत गेला की मग तोल सुटत जातो.

आपण जे काही मांडले ते राज्यातील किंवा देशातील कथित वास्तव आहे असे जरी या एकाकी टिकाकारांना किंवा असलेच तर त्यांच्या मागच्या अदृश्य हातांना वाटत असले तरी आणि प्रसंगी त्यांची टीका योग्य किंवा अयोग्य असली तरी त्यांना न्यायाधीशांची भूमिका कोणी बहाल केलेली नाही व तशी त्यांनी ती स्वतःहून स्वीकारूही नये. चुकांकडे दुर्लक्ष करावे असे कोणी म्हणणार नाही. मात्र, जेव्हा एखाद्या माध्यमाचा वापर जर शस्त्र म्हणून करणार असू तर त्याचा घातकपणा किती आहे व ते आपल्यावरच उलटणार नाही ना किमान याचीही दक्षता घेतली पाहिजे. अलीकडच्या काळात केवळ चर्चेत राहण्यासाठी अगोचरपणा केला जातो. कोणाचे पाठबळ असल्याशिवाय असे होऊ शकत नाही. आपल्या स्वातंत्र्याचा उपभोग घेताना इतरांच्या स्वातंत्र्यावर अथवा प्रतिष्ठेला बाधा निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे.

पान १ वरून

## मीच हिंदू धर्म वाचवू शकतो....

### विरोधी पक्षनेता का दिला जात नाही?

अनिल परब म्हणाले की, "खालच्या सभागृहात आम्हाला अद्याप विरोधी पक्षनेता दिला नाही. का दिला नाही हे आम्हाला लिहून द्या असं आम्ही अध्यक्षांना बोललो. पण ते यावर बोलायला तयार नाही. आम्ही काय गुन्हा केला आहे सांगव. आमच्याकडे संख्याबळ नाही म्हणून होत नसेल तर तसं लिहून द्या. पण तेही करत नाही."

### सभापती विरोधकांचा आवाज दाबतात

अनिल परब म्हणाले की, "आम्ही विधानपरिषद सभापती यांच्यावर अविश्वास दाखल केला आहे. कारण ते आम्हाला बोलू देत नाही. प्रत्येक ठिकाणी चिरडण्याचं काम ते करत आहेत असं अनिल परब म्हणाले. ते म्हणाले की, आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय लागला नाही. जस्टीस डिले इज जस्टीस डिनाय. आम्ही अल्पसंख्याक झाल्याने यांना सत्तेचा माज दिसतोय. बोलून द्यायचे नाही, विरोधकांना उडवून लावले जात आहे, चेपले जात आहे. आम्ही उपसभापतीवर अविश्वास ठराव आणला. नियमानुसार तो प्रस्ताव घेतला पाहिजे होता. पण तो तुम्ही नाकारला. तो कोणत्या कायद्याने नाकारला हे तरी दाखवा. आमचा अविश्वास प्रस्ताव नाकारला आणि लगेच तुम्ही विश्वासदर्शक प्रस्ताव आणला. केवळ तुम्ही घटनापीठावर बसलेला आहात त्यामुळे तुम्हाला चॅलेंज करता येत नाही. त्यामुळे आता आम्ही थेट सभापतींवर अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे."

**प्रबोधन**

# जत्रांना यापुढे । नवे द्या वळण

गावाकडील जत्रा हा विषय हौसे, नवसे आणि गवसे यांना जरी प्रिय असला, तरी तो सर्वांना प्रिय असतो, असं म्हणणं हा एक गैरसमजाचा प्रकार होईल. कारण जे लोक चिंतनशील असतात त्यांना जत्रा आवडत नाहीत. गदीर्च मानसशास्त्र (Mob psychology) ज्यांना त्याच्या अवगुणांसह माहीत आहे, ते जत्रेचं कौतुक कधीही करणार नाहीत. परीक्षार्थी तर नको त्या जत्रा या विषयावर निबंध लिहिता लिहिता प्रबंध लिहील. ज्येष्ठ नागरिक तर जत्रेचं नाव ऐकताच गाव सोडण्याची तयारी करतील. ज्यांच्या घरी आजारी व्यक्ती असतील, ते जत्रेवर कोणतं औषध द्यावं, याचा विचार करू लागतील. पर्यावरणवादी जलप्रदूषण, ध्वनिप्रदूषण आणि वायूप्रदूषण यांपैकी आधी कोणतं मोजावं, या गोंधळात पडतील.

जत्रा अशा अनेकांना तर अप्रिय असतातच, पण संतश्रेष्ठ कबीर आणि त्यांचे सच्छिष्य गाडगेबाबा यांना तर जत्रेचं वावडंच होतं. जत्रेला जाणारा प्रत्येकजण देवाचं नाव घेत जरी जत्रेला जात असला, तरी ताकाला जाऊन भांडं लपवण्याचा त्याचा प्रयत्न फार वेळ टिकत नाही. समाजसुधारक, परखड विचारवंत संत कबीर यांना लोकांचं हे ढोंग आवडत नाही. लोकांची खरडपट्टी काढताना ते म्हणतात, जत्रा में फत्तरा बिठाया। तीरथ भया पानी ॥ दुनिया भई दिवानी, पैसे की धुलधानी॥ अशा या जत्रा कोणाचं कल्याण करतात, हा एक संशोधनाचाच विषय आहे.

महात्मा गांधीजींनी खेड्याकडे चला असा संदेश दिला होता आणि खेडी सुधारली की, भारताच्या सुधारणेला वेळ लागणार नाही, असं म्हटलं होतं. God made the country and man made the town असं म्हणण्याइतके ते दूधखुळे नसले, तरी ग्रामोद्धार हाच राष्ट्रोद्धार असा मूलभूत विचार मात्र ते व्यक्त करायचे. त्यांनी खेड्यांच्या आमूलाग्र परिवर्तनाकडे कार्यकर्ते, विचारवंत, साहित्यिक आणि पत्रकार यांचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याचा अर्थ, या सर्वांनी खेड्यांच्या गुणावगुणांची चिकित्सा न करता, खेडूतांचे सर्व दुर्गुण पोटात घालून त्यांच्याकडे सहानुभूतीने पाहावं, असा होत नव्हता. गांधीजींना नेमकं काय हवं होतं, होत नव्हता. गांधीजींना नेमकं काय हवं होतं, ते सांगताना प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'गांधीजींच्या ग्रामराज्यात ग्रामनियोजन अभिप्रेत होतं.' उत्साही कार्यकर्त्यांनी ते समजून न घेता खेड्यांवर आंधळं प्रेम, अविवेकी निष्ठा आणि विचारहीन श्रद्धा ठेवायला सुरुवात केली. त्यामुळे खेडुतांचं ते सर्व चांगलं, सर्व उत्तम असा नवा संप्रदाय रूढ झाला.

शहरात बसून ते निष्पाप खेडे, ते निष्पाप खेडूत हे शब्द वापरणं किती बावळटपणाचं असतं, ते पु.ल. देशपांडे यांनी वाऱ्यावरची वरातमध्ये स्पष्ट केलं. पण जे तृणमूल पातळीवर काम करतात, त्या जागतिक कीतीर्चा बुकर पुरस्कार विजेत्या अरुंधती रॉय यांना खेडी अजून पाषाणयुगात जगतात, हे तेथील अंधश्रद्धा, दुबळ्यांवरील अत्याचार, स्त्रियांचं सर्वप्रकारे शोषण, जमीनदारांची क्रूरकर्म, अनाथ विधवांना हडळ, चेटकीण (witch) मानून तिचा दगडाने ठेचून जीव घेणं, हे सर्व दुर्दैवाने पाहावं लागलं आहे. खेड्यांचे हे करंटेपण कधी दूर होणार? असा प्रश्न प्राचार्य शिवाजीराव भोसलेही व्यक्त करतात. रस्तेबांधणी आणि विद्युतीकरणामुळे थोडा फरक पडला असला, तरी हेवेदावे, उच्च-नीच, गटबाजी, संकुचित मनोवृत्ती या बाबतीत मात्र खेडी अजूनही मध्ययुगातच वावरत आहेत.

अशा गावात भरणाऱ्या जत्रा भारतीय संस्कृतीचं मागासलेपण व्यक्त करीत नसतील तरच नवल. देवासमोर बकऱ्याची नरडी कापून खेडुतांचा हिंसाप्रेमी जीव शांत होत नाही. पाच वर्ष पोसलेला रेडा दिवसाढवळ्या जनसमुदायापुढे धारदार शस्त्रं भोकसून, रक्ताच्या चिळकांड्या उडवीत ठार मारणं हे क्रूर, रोमन संस्कृतीला शोभून दिसण्यासारखं कृत्य, खेडुतांना धर्मकृत्य वाटतं. 'अहिंसेचा संदेश सांगणारा हिंदू धर्म हा मला जगातील सर्व धमार्पेक्षा अधिक श्रेष्ठ वाटतो.' असं गांधीजी म्हणायचे. त्यांनी खेड्यातील ह्या रेडेजत्रा पाहिल्या नसतील, अन्यथा हिंदूधमार्चा व्यर्थ अभिमान त्यांनी बाळगला नसता.

ज्या दारुबंदीचा जन्मभर पुरस्कार महात्माजींनी केला, त्या दारूचं अक्षरशः थैमान जत्रेत सुरू असतं. प्रत्येक घरी दारूच्या घागरी ओसंडत असतात आणि आबालवृद्ध जत्रा संपेपर्यंत मद्यापानाने उन्मत्त झालेले असतात. मद्य-मांसाचा अंमल चढल्यावर धंदेवाईक मदीराक्षींना पाचारण केलं जातं आणि गावदेवीच्या साक्षीने लहान-थोर डान्सबारचा आनंद (?) लुटू लागतात. आपण संस्कृतीच्या कोणत्या पायरीवर उभे आहोत, हे खेड्यातील जत्रांवरून स्पष्ट होतं. या जत्रांची तोंडभर स्तुती करणारे पत्रकार खेडुतांचं प्रबोधन कधी करणार? थोर संत गाडगेबाबांनी जत्रेतील हिंसाचार प्राणपणाने थोपवला होता. त्यांचं उदाहरण स्वतःला सद्गुरू, संत, महंत, म्हणवणारे समाजापुढे का ठेवीत नाहीत? खरं तर, अहिंसाधमीर्यांनी सत्याग्रह करून जत्रांना नवं रूप द्यायला हवं. प्रारंभ केला, तर कोणतंही काम अवघड नसतं. म्हणून लक्षात घ्या-

जत्रेचे संकट । नेमानेच येते
लुटूनिया नेते। सर्वकाही ॥ १
तालेवारसुद्धा । कफल्लक होतो
गरिबाचा जातो। जीव पूर्ण ॥२
आधीच कंगाली । त्यात जत्रा आली
नागवण झाली । पुरेपूर ॥ ३
मद्यमांसभक्षी । येताती गिधाडे
रक्तसडा पडे । जेथे तेथे ॥४
बाप पाजी पोरा। दारू कौतुकाने
आपुल्या हाताने । घर जाळी ॥५
खुला डान्सबार । सर्वांना नासवी
जत्रेची थोरवी । किती गावी ? ॥६
खेडुतांनो पाहा । बदलला काळ
लावू नका वेळ । सुधारण्या ॥ ७
जत्रांना यापुढे । नवे द्या वळण
स्नेहसंमेलन । थोर व्हावे ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

**प्रबोधन**

# Research - संशोधन कसे असावे
# आंधळा समाज । फिरे ठेचा खात

इश्क ने बरबाद किया गालीब, वरना हम भी थे आदमी कुछ काम के । पंडित नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाचं वर्णन करताना आचार्य अत्रे यांनी गालीबच्या शायरीतील इश्क शब्दाऐवजी पॉलिटिक्स हा शब्द वापरून नेहरूंच्या विद्वतेचं वर्णन केलं होतं. 'पॉलिटिक्सने बरबाद किया नेहरूजी को! वरना वे आदमी थे बडे काम के।' पंडित नेहरूंच्या संशोधकी बुद्धीची, अभ्यासूपणाची, व्यासंगीपणाची जनतेला ओळख करून द्यावी, अशी आचार्य अत्रे यांची इच्छा होती. असो. पंडित नेहरूंनी विश्वविद्यालयीन शिक्षणाला समृद्ध करण्याचा प्रयत्न अनेक प्रकारे केला. पण आजच्या विश्वविद्यालयीन संशोधनाचा दर्जा पाहाता, आपण त्या महापंडिताला शोभणारं वर्तन करीत नाही, असंच खेदानं नमूद करावं लागतं. विद्यापीठ अनुदान मंडळाने डॉक्टरेटचा (विद्यावाचस्पती) वेतनवृद्धीशी संबंध जोडल्याने पूर्वी शुकशुकाट असलेल्या संशोधनक्षेत्रात धनलोभी, सत्तालोभी प्राध्यापकांनी गजबजाट माजवला आहे. यात्रेत हौसे, नवसे, गवसे जमतात; तसं ह्या संशोधनेच्छू प्राध्यापकांचं वर्तन संशोधनाचा केवळ देखावा निर्माण करणारंच आहे, इतकी त्यांची संशोधनं कुचकामी आहेत.

संशोधनकायार्साठी मार्गदर्शकाची आवश्यकता असते. बऱ्याच संशोधन करू इच्छिणाऱ्यांना मार्गदर्शक का उपलब्ध होत नाहीत? द्रोणाचार्यांनी एकलव्याला आपल्या प्रशिक्षण केंद्रात प्रवेश का दिला नव्हता? हे आज सर्वांना माहीत आहे. आजचे मार्गदर्शक द्रोणांचाच नवा अवतार आहेत. पण आजचे एकलव्य सोन्याच्या किल्लीने प्रशिक्षण केंद्राची कुलपं उघडण्यास त्यांना भाग पाडताहेत आणि बुद्धिमत्ता पणाला न लावता युक्तीने विद्वान होण्याचा प्रयत्न करीत आहेत.

पण युक्त्या - प्रयुक्त्या लढवून संशोधनक्षेत्राचं भलं होत नाही. ज्ञानाची वाढ ही मूलभूत संशोधनावर अवलंबून असते. त्यामुळे आडात नाही, तर पोहऱ्यात कुठून येणार? अशी गत ज्ञानाची होते. संशोधनाला एक दर्जा असावा लागतो. संगीतापासून गणितापर्यंत सर्व क्षेत्रात संशोधन करता येतं. पण संशोधनाने आजच्या ज्ञानात नवी भर कोणती घातली, हे पाहिलं पाहिजे. पुष्कळ वेळा संपादन कायार्ला संशोधन म्हटलं जातं. हिंदी-मराठीत व्यक्ती आणि वाङ्मय अशा शीर्षकाची संपादनं शोधप्रबंध म्हणून खपवली जातात. राम गणेश गडकरीः व्यक्ती आणि वाङ्मय हे संपादन आहे आणि समग्र राम गणेश गडकरी हेसुद्धा संपादनच! पण मराठी नाट्यसृष्टीतील राम गणेश गडकरी यांचं स्थान हा शोधप्रबंध आहे. राम गणेश गडकरी यांचे भाषाप्रभुत्वः एक अभ्यास हा शोधप्रबंध होऊ शकतो. मार्गदर्शकांना एवढं कळावंच.

मराठी संशोधनक्षेत्राला दर्जाहीनपणाचा जसा रोग जडलेला आहे; तसाच जुन्या पोथ्या पुराणांच्या संशोधनाचाही भयंकर हानीकारक रोग बळावलेला दिसतो. महाराष्ट्रात पोथ्या-पुराणांना पूर्वीही तोटा नव्हता आणि आजही तोटा नाही. गावोगावी माऊली, बुवा, महाराज, स्वामी, बाबा, यांचं उदंड पीक आलं आहे. त्यांच्या वचनांचे; रचनांचे संग्रह जर संशोधनासाठी कुणी घेत असेल, तर तो केवळ कालापव्यय आणि द्रव्यापव्ययच म्हणावा लागेल.

संशोधनाचा वस्तुपाठ म्हणून विद्रोही तुकाराम ह्या डॉ.आ.ह. साळुंखे यांच्या ग्रंथाकडे पाहावं. अमर्त्य सेन यांच्या अर्थशास्त्रीय संशोधनाकडे पाहावं. प्रो. मोहम्मद युनूस यांच्या कार्यावर शोधप्रबंध लिहावेत. लोकशाहीतील लोकमताच्या लहरीपणाचं संशोधन व्हावं. अणुस्फोटातील युरेनियमचे शरीरावर होणारे परिणाम शास्त्रज्ञांनी चाचणी स्फोटाआधी जाहीर केले असते तर जागतिक राजकारणाला सावधगिरीचं वळण लागलं असतं. हवा, पाणी यांच्या प्रदूषण समस्येवरील संशोधनाच्या अभावी होणारे दुष्परिणाम जग भोगत आहे. व्यक्तीचं शरीर, मन आणि समाज यांच्या निकोप वाढीसाठी संशोधनंच आवश्यक आहेत.

समाजोपयोगी, बुद्धिनिष्ठ, मूलभूत संशोधनांची नितांत गरज प्रत्येक समाजाला असतेच. अशी संशोधनं जितकी होतील, तितकी हवी आहेत. कारण -

संशोधन हेच । ज्ञानाचे टॉनिक
प्रगतीची मेख । शोध आहे ॥ १
व्यष्टी - समष्टीच्या । गरजा पाहून
करा संशोधन । चिकाटीने ॥२
जीवना निष्प्राण । करणारे प्रश्न
सांगा सोडवून । नव्या वाटा ॥ ३
आंधळा समाज। फिरे ठेचा खात
दिवा अंधारात । उठा लावा ॥४
पोथ्या हाताळून । चिंध्या चिंध्या झाल्या
अभ्यासात गेल्या । पिढ्या वाया ॥५
अर्थशास्त्र आणि आरोग्याचे शास्त्र
मूलभूत हित । त्यात आहे ॥ ६
समाजाचे हित । व्हावे अभ्यासाने
अशी संशोधने । आवश्यक ॥७
जगाचे कल्याण । पूर्ण होण्यासाठी
संशोधनापाठी। वेगाने जा ॥ ८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# शिव्या दिल्या तर याद राखा !

महिला दिनाचे औचित्य साधून रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील पाचेरी या कोकणातल्या गावाने शिव्या बंदीचा ठराव केला आहे.शाळांमध्ये भांडताना किंवा चावडीवर गप्पा मारताना शिव्यांचा वापर गावात करता येणार नाही.मात्र आता गावामध्ये कुणीही शिवी दिली, तर त्याला चक्क ५०० रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. गावानं एकमुखानं तसा ठरावच केलाय...

मागील तीन महिन्या खाली सौंदळा (ता. नेवासा, जि. अहिल्यानगर ) या गावाने देखील शिव्यांवर बंदी घातली आहे; त्यासाठी शिवीघाळ केल्यास ५०० रुपये दंड भरावा लागेल,असा ठराव या गावच्या ग्रामपंचायतीने देखील केला आहे. सौंदाळा गावात तर ठीक-ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांना ऑडिओही बसवण्यात आलाय. त्यामुळं कोणीही शिवी दिली तर लगेचच ग्रामपंचायतमधील कर्मचाऱ्यांना याची माहिती कळते. गावातील सलोखा राखण्यासाठी आणि भविष्यातील पिढ्यांना चांगले संस्कार देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे, असे तेथील गावकऱ्यांचे मत आहे. आता या गावांचे अनुकरण महाराष्ट्रातील इतर गावे करत आहेत.आई व बहिणीचा कुठलाही दोष नसताना शिवीगाळ करून अर्वाच्च शब्द वापरून स्त्री देहाचा अपमान केला जातो. अशी भावना ठराव करणाऱ्या गावातील ग्रामस्थ मांडत आहेत .

आई-बहिणीवरून शिव्या देणे ही एक सामान्य गोष्ट आज आपल्या समाज जीवनात बनली आहे. दुसऱ्या वरील संताप व्यक्त करण्यासाठी माणूस त्याला मारहाण करून 'शारीरिक हिंसा' अथवा शिव्या देऊन समोरच्याची 'भावनिक हिंसा' करण्याचा प्रयत्न करत असतो. खरंतर राग येणे ही एक मनोविकृतीच मानली जाते. मनासारखं घडत नसल्यास, समोरच्याने गैर कृत्य केल्यास राग अनावर होऊन माणूस हिंसक बनत असतो. आयुवेर्दामध्ये पित्त प्रवृत्तीचे लोक हे अति कोपिष्ट असल्याचे सांगितलं जातं. हे सार खरं असलं, तरी माणसाला स्वतःच्या रागावर नियंत्रण करता येतं हेही तितकंच खरं आहे. रागाच्या भरात काही जणांकडून गंभीर गुन्हा होतो; व पुढे त्याला आयुष्यभर त्याची किंमत मोजावी लागते. 'अति राग आणि भीक माग!' अशी वेळ अनेकांच्या बाबतीत आलेली आपल्याला दिसून येते. रागाच्या भरात माणूस समोरच्या व्यक्तीला त्याच्या आई-बहिणीवर गलिच्छ भाषेत शिव्या देतो.यातून फार मोठा संघर्ष निर्माण होतो. मारामारी होते, खून पडतात आणि कुटुंबच्या कुटुंब देशोधडीला लागतात.

मुलं ही मोठ्यांचे अनुकरण करत असतात. ती घरातील व समाजातील मोठी माणसं जशी वागतात, बोलतात तसंच ती करत असतात. मुलांना शाळेतील कविता लवकर पाठ होत नाहीत, परंतु सिनेमाची गाणी आणि शिव्या लवकर पाठ होतात. जर अख्ख्या गावातील वडीलधारी मंडळीच शिव्या देणं बंद करणार असतील तर आपसूकच तेथील भविष्यातील पिढीही खऱ्या अर्थाने सुसंस्कारी बनवणार आहे. या ठरावा सोबतच काही गावांनी 'बालकामगार मुक्त 'आणि 'बाल विवाह मुक्त' करण्याचा देखील निश्चय केला आहे. संध्याकाळी सात ते नऊ या वेळे दरम्यान शालेय विद्यार्थ्यांनी मोबाईल वापरायचा नाही हा देखील ठराव काही गावानी केले आहेत. भविष्यात ही गावं भौतिक प्रगती बरोबरच सांस्कृतिक दृष्ट्या देखील वैभवशाली बनणार आहेत.

समोरच्या व्यक्तीच्या सन्मानावर आघात करण्यासाठी आणि त्याचा उपमर्द करण्यासाठी त्याच्या आई, बहिण आणि घरातील इतर स्त्रियावरून अश्लील भाषेत शिवीघाळ करण्याची असंस्कृत परंपरा अनेक वर्षापासून आपण जोपासत आलो आहोत. बदलत्या काळात मानव जातीला अपमानास्पद वाटणाऱ्या या जुन्या लांच्छनास्पद सामाजिक परंपरेला आता मुठमाती देण्याची वेळ आली आहे. ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागात देखील लोक अत्यंत गलिच्छ आणि अश्लील भाषेत चारचौघात शिव्या देताना दिसतात. एखादा व्यक्ती दहशत निर्माण करण्यासाठी चार चौघात शिवीघाळ करत असतो; त्यावेळी त्याला तेथे उपस्थित असणाऱ्या महिलांमध्ये प्रचंड लज्जा उत्पन्न होते याची सुद्धा फिकीर नसते. जातीवरून शिव्या देणाऱ्या वर 'अँट्रोसिटी' कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल होतो. त्याचप्रमाणे स्त्रियांच्या खासगी भागावरून शिव्या देणाऱ्या वर देखील गुन्हे दाखल केले पाहिजेत. 'शिव्या दिल्या तर याद राखा!' हा इशारा शिव्या बंदीचा ठराव करणाऱ्या गावांप्रमाणे आता शासनाने देखील ठणकावून दिला पाहिजे.



**किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# स्व. अण्णासाहेब पाटील यांची 43 वी पुण्यतिथी पंढरपूरात साजरी

**पंढरपूर (कटुसत्य वृत्त):-** क्रांतिसुर्य, कष्टकऱ्यांचे कैवारी, माथाडी कामगार नेते स्व. अण्णासाहेब पाटील यांची 43 वी पुण्यतिथी, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ उपकेंद्र, पंढरपूर या कार्यालयामध्ये उत्साहात साजरी करण्यात आली.



यावेळी उपस्थितांकडून स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अण्णासाहेब पाटील महामंडळाचे जिल्हा समन्वयक सौरभ मगर लोकमंगल बँकेचे वसुली अधिकारी ॲड. शिवाजी दरेकर, लोकमंगल बँकेचे व्यवस्थापक विनोद जगदाळे तसेच महेश यादव, शिवाजी मोरे, विशाल बागडे व लाभार्थी उपस्थित होते.

# आयुष्यात मनासारखे जगता आले पाहिजे

**बार्शी (कटुसत्य वृत्त):-** आपल्या आयुष्यात मोठ्या प्रमाणात भौतिक सुखसुविधा मिळाल्या म्हणजे यशस्वी झालो असे म्हणता येत नाही. समाजातील इतर लोकांना त्रास न देता आपल्या आयुष्यात मनासारखे जगता आले पाहिजे, असे मत निवृत्त आयएएस अधिकारी तथा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी व्यक्त केले.



येथील श्री शिवाजी महाविद्यालयामधील कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्पर्धा मार्गदर्शन केंद्र आणि यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त 'आजची तरुणाईः संधी आणि आव्हाने' या विषयावर आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. पांढरपट्टे बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त आयएएस अधिकारी दिनकरराव जगदाळे हे होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. रामेश्वर कोठावळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे खजिनदार तथा यशवंतराव चव्हाण सेंटरचे सदस्य जयकुमार शितोळे यांनी केले. प्रमुख पाहुण्याचा परिचय डॉ. राहुल पालके यांनी करुन दिला.

दरम्यान, यावेळी डॉ. डॉ. मामासाहेब जगदाळे स्पर्धा परीक्षा अभ्यासिकेचा शुभारंभही करण्यात आला. यावेळी त्यांनी सामाजिक भान जागृत करण्यासाठी निवडक गझलांचे सादरीकरण करुन विद्यार्थ्यांची मनेही जिंकली. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना जगदाळे म्हणाले, केवळ एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होणे म्हणजे यशस्वी होण्याचा मार्ग नाही. इतर क्षेत्रात स्वतःच्या पायावर उभे राहून यशस्वी उद्योजक होता येईल, असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर गरड यांनी केले तर आभार कला शाखेचे समन्वयक प्रा. डॉ. बिरा पारसे यांनी मानले.

### वात्रटिका
## खासदार वेतन वाढ

आपल्याच हातात आहे
त्याला ना मुहूर्त ना मिती...
भरून घेऊ जे भरता येईल
आपली झोळी राहू नये रिती...
खासदारांसाठी खास झाले
आणि खिसे भरून गेले...
पेन्शन, वेतन बरोबर आता
भत्त्याचेही आकडे फुगले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सण उत्सव साजरे करताना शांतता आणि सामाजिक सलोखा राखावा

## उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांचे आवाहन



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** रामनवमी, रमजान ईद, हनुमान जयंती, महात्मा फुले जयंती, गुढीपाडवा आदी आगामी काळात येणार सण, उत्सव सर्वांनी शातंतेमध्ये साजरे करावेत. सर्वधर्मीय बांधवांनी एकमेकांच्या भावनांचा आदर करीत हे, सण उत्सव साजरे करावेत. या काळात सामाजिक सलोखा, शांतता कायम राखून प्रशासनाने दिलेल्या सुचनांचे पालन करावे असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी केले आहे.

सण, जयंती उत्सव व रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर पोलीस संकुल पंढरपूर येथे शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस प्रशिक्षणार्थी आयपीएस अंजना कृष्णन, तहसीलदार सचिन लंगुटे, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, तय्यब मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर तालुक्यातील पोलीस पाटील तसेच शहर व तालुक्यातील समाज बांधव उपस्थित होते.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.भोसले म्हणले पंढरपूर तालुक्यात सर्व जाती-धर्मीय बांधव एकत्र येवून सण, उत्सव साजरे करतात, ही आजपर्यंतची परंपरा आहे. त्यामुळे आजपर्यंत तालुक्यात सामाजिक सलोखा आणि शांतता टिकून असून हीच परंपरा कायम राखणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. आगामी काळात साजरे होणारे सण, जयंती उत्सव काळात सर्वांनी नियमांचे पालन करून आणि एकमेकांच्या भावनांचा आदर करून उत्साही वातावरणात साजरे करावेत. सण, जयंती उत्सवाच्या अनुषंगाने लावण्यात येणारे बॅनर हे स्थानिक प्रशासनाच्या परवानगीने लावण्यात यावेत.तसेच ते वेळेत काढून घ्यावेत. मोबाईलवर आक्षेपार्ह स्टेटस ठेवू नये, तसेच आवाजाच्या मर्यादेचे पालन करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी पोलीस निरिक्षक घोडके म्हणाले सर्व जाती धमार्तील समाज बांधवानी आप आपले सण उत्सव शांततेत व उत्साही वातावरणात साजरे करावेत. सोशल मीडियावरील पोस्टची खात्री केल्याशिवाय ती व्हायरल करू नये. सोशल मीडिया वापरतांना खबरदारी घ्यावी. समाज मन बिघडवणारी अनुचित पोस्ट व्हायरल करणे टाळावे. सोशल मीडियावरील बहुतांश आयडी चुकीच्या असल्याने अशा चुकीच्या आयडीला लाईक किंवा पोस्ट शेअर करू नये. कोणी आक्षेपार्ह पोस्ट ठेवली तर त्याची माहिती पोलिसांना द्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी पंढरपूर तालुक्यात शांतता अबाधित ठेवण्यासाठीच्या उपाययोजना काय व कशा याविषयी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना बैठकीत समाधानकारक उत्तरे दिली.

# मराठा म्हणजे एक जात नाही तर छत्रपतींच्या महाराष्ट्रातील प्रत्येक जात म्हणजेच मराठा - सौरभ खेडकर



**टेंभुर्णी (कटुसत्य वृत्त):-** मराठा म्हणजे एक जात नाही तर छत्रपतींच्या महाराष्ट्रातील प्रत्येक जात म्हणजेच मराठा असून एकट्या मराठा जातीचे सैन्य नव्हते तर त्यात सर्व अठरा पगड जाती धर्माचे व बारा बलुतेदार यांना शिवरायांनी मावळा शब्दात सर्वांना एकत्र केले होते.यामुळेच आपण मुस्लिमासह सर्व जाती धमार्चे लोकं एकोप्याने राहत आहोत असे प्रतिपादन सौरभ खेडेकर यांनी केले.

सौरभ खेडेकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेल्या जिजाऊ रथयात्रेचे आगमन सोमवारी सायंकाळी मराठा सेवा संघ संचालित 'जिजाऊ रथयात्रा २०२५'मराठा जोडो अभियान' या यात्रेचे आगमन झाले.यावेळी उपस्थिताना संबोधित करताना सौरभ खेडेकर हे बोलत होते.

पुढे बोलताना खेडेकर म्हणाले की, जिजाऊने सोन्याचा नांगर फिरवून पुणे वसविले आहे. पुण्यातील लाल महालात ६५०० कि.मी.प्रवास करून जिजाऊ रथयात्रेची सांगता होणार आहे. सर्वांच्या वतीने शिवजयंती साजरी होत आहे.मात्र अलीकडे दोन-तीन वर्षात हे वातावरण नासविण्याचे कार्य काही घातक शक्तीकडून करण्यात येत आहे. हे वातावरण शांत राहण्यासाठी सजग नागरिकांनी बाहेर पडले पाहिजे.युवकांना मार्गदर्शन करायला हवे.आपण सर्वांकडून जबाबदारी स्विकारून दंगल मुक्त महाराष्ट्र घडविण्यासाठी प्रयत्न व्हावेत. प्रगतीसाठी शांतता समन्वयाचे वातावरण असले पाहिजे.शाहू,फुले, आंबेडकर यांच्या विचाराशी एकरूप झाले पाहिजे.यात्रेस प्रचंड प्रतिसाद लाभत असून विचारांची भूक खूप वाढली आहे.वेग वाढवून शांतता प्रस्थापित करावयाची आहे.आरक्षण हे तर हक्काचेच आहे.ते मिळालेच पाहिजे पण ते एकच ध्येय असू नये असेही खेडकर म्हणाले.नौकऱ्या शिल्लक नाहीत. त्या भरल्या जात नाहीत. यामुळे विचार करून सावध पावले उचलली पाहिजेत. यासाठी उद्योजक व शेती व्यवसाय करायला हवा.जे टाळता येईल ते टाळले पाहिजे.सर्वांनी साधी लग्ने केली पाहिजेत. असलेले पैशाचा काळजीपूर्वक वापर केला पाहिजे. कोण कबरीचे काढतो, कोण दुसरेच काही काढतोय.यामुळे भावनिक होऊन काही करू नका. नवीन समाज निर्मिती झाली पाहिजे असे ही शेवटी सौरभ खेडेकर म्हणाले.

टेंभुर्णी येथील संभाजी चौकापासून शिवाजी चौकापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून तेथे सभेचे आयोजन करण्यात आले.यावेळी शेकडो शिवभक्तांनी जिजाऊ रथाचे दर्शन घेतले. संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी डॉ गजानन पारखी, उमाकांत उफाडे-प्रदेश संघटक, मनोज गायकवाड-राज्य संघटक, सभापती विक्रमसिंह शिंदे, माजी उपसभापती तुकाराम ढवळे, भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, रयत क्रांतीचे प्रा.सुहास पाटील, सचिन खुळे-ता.कार्याध्यक्ष, शिवसेनेचे तालुकाप्रमुख मधुकर देशमुख, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी तालुकाध्यक्ष औदुंबर भाऊ देशमुख, तांबवे गावचे नेते राजाभाऊ खटके, तात्यासो पाटील-मा.जिल्हाध्यक्ष मराठा सेवा संघ, दिनेश जगदाळे-रा. का. सदस्य, प्रहार संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अमोल जगदाळे, मार्केट कमिटीचे संचालक नागनाथ खटके, टेंभुर्णी सरपंच सुरजा बोबडे, सामाजिक कार्यकर्त्या शिलाताई पाटील, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रा.मिनाक्षी जगदाळे, माजी सभापती यशोदाताई ढवळे, संजीवनी आरबोळे, आरपीआयचे संघटक परमेश्वर खरात, संभाजी ब्रिगेडचे तालुका संघटक सतीश चांदगुडे,आर पीआय चे जयवंत पोळ, शिवसेनेचे टेंभुर्णी शहर प्रमुख सुरेश लोंढे, सापटणे टें चे माजी उपसरपंच दत्ता ढवळे, टेंभुर्णी चे सामाजिक कार्यकर्ते गोरख बप्पा देशमुख, सोमनाथ महाडीक, यशोदिप कॅम्पुटर चे संस्थापक अध्यक्ष गोरख खटके सर, नानासाहेब ढवळे, चव्हाणवाडी चे माजी सरपंच हनुमंत चव्हाण, राजकूमार भोसले, मराठा सेवा संघ शहराध्यक्ष पपेश पाटील, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष योगेश मुळे, वैभव महाडिक-ग्रां.पं.सदस्य, भीमराव भरगंडे, दादासो पिसाळ, विजय काळे, अजय गायकवाड-तालुकाध्यक्ष का.आ, शंकर नागणे-कार्यालयीन सचिव, अशोक खटके, गणेश केले, सोमनाथ काका कदम, चव्हाणवाडी टें ब्रिगेडचे अध्यक्ष अविनाश नांगरे, रामभाऊ मिटकल, यांच्यासह परिसरातील पदाधिकारी, महिला, पुरुष मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागरिकांना क्यूआर कोड वर तक्रार नोंदवण्याची सुविधा

## सेतूसंबंधीच्या तक्रारीसाठी क्युआर कोडची सुविधा

**पंढरपूर (कटुसत्य वृत्त):-** पंढरपूर उपविभागातील पंढरपूर व मोहोळ तालुक्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्र व सेतू कार्यालयात दर्शनी भागात क्यू आर (दफ)कोड उपलब्ध करून देण्यात आले आहेत, संबंधित नागरिकांनी क्यु आर कोड स्कॅन करून यावर तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, यावरील तक्रारीची तात्काळ दखल घेऊन त्यासंबंधी कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

पंढरपूर उपविभागातील पंढरपूर व मोहोळ तालुक्यातील सर्व महा ई सेवा केंद्र तसेच सेतू कार्यालय, तहसील कार्यालय येथे क्यु आर कोड लावण्यात आले आहेत. यामध्ये केंद्रचालकांनी दाखल्या साठी शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिकची रक्कम मागणी केल्यास, दाखला विहीत मुदतीत दिला नाही अथवा विलंब केला तर, दाखल्या संदर्भात संबधिताला एसएमएस व्दारे माहिती न दिल्यास, एजंटाव्दारे संबधित नागरिकांकडे अधिकचे पैसे मागणी केल्यास अशा कोणत्याहीप्रकारच्या तक्रारी असल्यास नागरिकांनी क्यु आर कोड स्कॅन केल्यास त्यावर तात्काळ आपली तक्रार नोंदविता येईल.

नागरिकांनी क्यू आर कोड स्कॅन करून तक्रार नोंदवणीच्या दिलेल्या अद्यावत सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# सोलापूरात विश्वतांसाठी 27 मार्चला कार्यशाळेचे आयोजन

**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती, धर्मादाय सह आयुक्त, पुणे यांच्या निर्देशननुसार गुरूवार दि.27 मार्च 2025 रोजी सकाळी 9.30 ते दुपारी 2.00 वाजेपर्यंत डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे विश्वतांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती धमार्दाय उप आयुक्त (प्रतिनियुक्त न्यायाधिश) प्रविण अ. कुंभोजकर यांनी दिली आहे. सदर कार्यशाळेत संस्था नोंदणी अधिनियम, 1860 व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये विश्वतांना दाखल करण्यात येणाऱ्या प्रकरणात विविध तज्ञामार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शंभर दिवसांचा 'कृति आराखडा' च्या अनुषंगाने क्षेत्रिय शासकीय व निमशासकी कार्यालयांसाठी 100 दिवसांसाठी 7 कलमी कृति आराखडा प्रमाणे सुकर जीवनमान नागरीकांना मिळणाऱ्या सेवा जास्तीत जास्त सुलभ करण्याच्या दृष्टीने प्रचिलित कामकाजाच्या पध्दतीचे पुनर्विलोकन करून प्रशासकीय पध्दतीमध्ये किमान दोन सेवा अतिशय सुलभ पध्दतीने द्याव्यात . नागरीकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे याकरिता सातत्याने प्रयन्त करावेत या अनुषंगाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी विश्वतांना या कार्यशाळेस जास्तीत जास्त संखेने उपस्थित राहवे असे, आवाहन धमार्दाय उप आयुक्त, (प्रतिनियुक्त न्यायाधिश) प्रविण अ. कुंभोजकर यांनी केले आहे.

# अंमली पदार्थ विरोधात कारवाई सोबतच जनजागृती आवश्यक - जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी



**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** जिल्ह्यात अंमली पदार्थ वाहतूक, विक्री तसेच सेवनाबाबत आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे. जिल्हास्तरीय नार्को कोऑर्डिनेशन केंद्र समितीच्या माध्यमातून सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करुन कारवाई व त्यासोबतच जनजागृतीवरही भर द्यावा,असे निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिले.

जिल्ह्यात अंमली पदार्थ तस्करी व वापरावर आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय नार्को कोऑर्डिनेशन समितीची पोलीस अधीक्षक कार्यलय सोलापूर (ग्रामीण ) येथे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीस अधीक्षक सीमा शुल्क विभाग महेंद्र प्रताप, जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालय प्रतिनिधी अभिजित धेटे, उपसंचालक औद्योगिक सुरक्षा संचालनालय ओम भांडेकरी, सहा. आयुक्त समाज कल्याण एस.एम.शिंदे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ किरण चव्हाण, पोलीस आयुक्त शहर कार्यालय क्षिरसागर , अन्न वऔषध प्रशासन कार्यालय द.रा विरगे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मिलींद कारंजकर, राज्य उत्पादन शुल्कचे जगन्नाथ पाटील, केंद्रिय गुप्त वातार्चे वासुदेव अपसिंगेकर, नायब तहसिलदार (गृह शाखा) बालाजी बनसोडे, सहा. पोलीस निरिक्षक (ग्रामिण) विशाल वायकर तसेच शासकीय विभाग प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक म्हणाले, जिल्ह्यात अंमली पदार्थ विक्री व सेवनास आळा घालण्यासाठी जनजागृतीवर भर देण्यात यावा. अंमली पदार्थाची वाहतुक रोखणे यासाठी संयुक्त कारवाई होणे अपेक्षित आहे. याबाबत गुप्त माहिती घेऊन प्रतिबंध करणे, ही उपाययोजना करीत असतांना समाजात जनजागृतीच्या माध्यमातून व्यसनाधीनते विरोधात प्रबोधन करावे. तसेच खाजगी डॉक्टरर्स मानसपोचार तज्ञ यांच्या मदतीने जनजागृती करून अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या रूग्णांना समुपदेशन करावे. राज्य उत्पादन शुल्क विभाग व पोलीस यांनी केमिकल कारखाने तसेच बंद पडलेले कारखाने यांना भेटी देऊन तपासणी करावी. जिल्ह्यातील शहरी -ग्रामिण भागातील सर्व औषध विक्रेते दुकानाची वेळोवेळी अन्न औषध प्रशासानाने तपासणी करावी. शाळा महाविद्यालये,विद्यापिठ आदी ठिकाणी विद्यार्थी यांच्या मध्ये जनजागृती करावी. जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी यांच्या मदतीने समाजात अमली पदार्था विरोधी जनजागृतीपर कार्यक्रम घ्यावेत अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या

तसेच अमली पदार्थांच्या विक्री व वाहतुकी संबंधी माहिती मिळाल्यास पोलीस विभागाने विकसित केलेल्या क्यूआर कोड वर माहिती द्यावी संबधितांचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. असेही पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.

# भूमापन कार्यालयात मिळकतीबाबत शंका, समाधान व माहिती कार्यक्रमाचे आयोजन

**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** शासनाने ठरवून दिलेल्या 100 दिवसांतील उपक्रमांतर्गत सोलापूर शहर नगर भूमापन अधिकारी, सोलापूर यांचेकडील हद्दीतील मिळकतींकरीता शंका समाधान व माहिती देणे हा कार्यक्रम दि.28 मार्च 2025 रोजी नगर भूमापन कार्यालयामध्ये राबविण्यात येणार आहे. या करीता लष्कर, निमलष्कर, सी.आर.पी.एफ, पोलीस व होमगार्ड इत्यादी सेवेत कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे शंका समाधान व माहिती देणे हा उपक्रमक राबविण्यात येणार असल्याची माहिती भूमापन अधिकारी गजानन पोळ यांनी दिली आहे.

तरी सोलापूर शहर भूमापन हद्दीतील उपरोक्त विभागातील संबंधीतांनी दि.28 मार्च 2025 रोजी दुपारी 4.00 ते सायंकाळी 6.00 च्या दरम्यान कार्यालयामध्ये येवून सदर उपक्रमाचा लाभ घेण्यात यावा. यावेळी येत असताना संबंधीतांनी आपले ओळखपत्र सोबत आणावे व या उपक्रमांतर्गत अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचे वैयक्तीक व स्वतः चे मिळकतीच्या माहितीबाबत स्वतः उपस्थित रहावे, असे आवाहन सोलापूर नगर भूमापन अधिकारी श्री. पोळ यांनी केले आहे.


# भीमा-सीना जोडकालवा परिसरातील शेतीपंप विजपुरवठा पूर्ववत करावा

## आ.नारायण पाटील यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** भीमा-सीना जोडकालवा परिसरातील शेतीपंप वीजपुरवठा पुर्ववत करावा अशी मागणी आमदार नारायण पाटील यांनी सोलापूर जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे. जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आलेल्या निवेदनातुन आमदार नारायण पाटील यांनी शेतकऱ्यांना बसणाऱ्या संभाव्य आर्थिक फटका व पिकांची सद्यस्थिती याचा प्रशासनानेही गंभीर विचार करावा असे सुचित केले आहे. याबाबत अधिक बोलताना आमदार नारायण पाटील म्हणाले की, भीमा-सीना बोगदा तसेच सीना नदीच्या दोन्ही तीरावरील शेती पंपाच्या वीज पुरवठ्यात प्रशासनाने कपात केली असुन याचा थेट परिणाम शेतातील उभ्या पिकांवर होत आहे. उजनीतून सीनेचे सोडलेले आवर्तन पुर्ण होईपर्यंत या परिसरातील शेती पंपाच्या वीज पुरवठ्यात खंड पडला आहे. वास्तविक पाहता यामुळे कंदर, सातोली, केम तसेच दहिवली, उपळवटे, ढवळस, बारलोणी, महादेववाडी, गवळेवाडी, पिंपरी, कव्हे आदि गावाच्या शिवारातील तसेच बोगदा व नदी काठच्या उभ्या पिकांवर गंभीर परिणाम होऊ लागला आहे. केळी सारखी नगदी पिके वेळीच पाणी नाही मिळाले तर वाया जातील. यामुळे पिक उत्पादनावर दुष्परिणाम होऊन करोडो रुपयांचे नुकसान होण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे आता तातडीने या पिकांना जीवदान देण्यासाठी या भागातील शेतीपंप वीजपुरवठा पुर्ववत करावा व शेतकऱ्यांना मुबलक वीज देण्यात यावी. समोर पाणी असुनही हाताशी आलेली पिके वाया जातील याचा विचार प्रशासनाने वेळीच करावा. सध्या शेतकऱ्यांमध्ये वीज कपातीच्या आदेशामुळे तीव्रसंताप असुन प्रशासनानेही याची वेळीच दखल घ्यावी, असेही आमदार नारायण पाटील यांनी दिलेल्या निवेदनातून म्हटले आहे.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) या समाजाची आरक्षणाची मागणी आहे २) पटकन, त्वरेने ३) सय उलट लिहा ४) तारीख (इंग्रजीत) ५) अवैधरित्या खेळला जाणारा आकड्यांचा खेळ ६) सीतापती ७) भारतीय क्रिकेटर व युवा यष्टीरक्षक फलंदाज १०) बंदी ११) रस्सी १३) शाहीर वाजवितात तो १४) पोशाख, जसा देश तसा ** १६) सूर्यप्रकाशापासून बनविलेली उर्जा - ** उर्जा १८) मोठी पेटी १९) निरर्थक, व्यर्थ २०) तीव्र वेदना २१) एक गोल आकाराची मोठी फळभाजी २२) आपला देश २३) स्वराज्यरक्षक २४) एक दिनदर्शिका- **निर्णय २५) फळ्यावर लिहिण्यासाठी हा वापरतात २६) धोका २७) स्पर्श (इंग्रजीत) २९) श्री विष्णूचा एक अवतार ३१) शरीर ३३) लक्ष वेधण्यासाठी केलेले हातवारे ३५) बोभाटा, बोलबाला ३६) कुर्त्याप्रमाणे एक वस्त्र ३७) दारामधील किंचीत भेग ४०) पाणी, तोय ४२) उत्सव ४४) विश्व ४५) अडचण, गरज

**आडवे शब्द :** १) बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे नेते
५) या समाजाने आरक्षणाच्या मागणीने महाराष्ट्र ढवळून काढला होता
८) लहान बाळाला टोचतात ती
९) प्रवासी वाहतूक करणारी ग्रामीण भागातील लहान गाडी
११) गुण शब्दाच्या विरूध्दार्थी १२) भडक, फिकट नसलेला
१५) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण
१६) एक माजी क्रिकेटपटू- *** गांगुली १७) खडबडीत (इंग्रजीत)
१८) पेशव्यांचा काळ २०) एक म्हण- ** नाही त्याला डर कशाला
२१) स्वभावाने साधा २२) शिजवलेला तांदुळ
२३) श्रीलंका क्रिकेट टीमचा एक माजी कर्णधार
२५) एक म्हण- उथळ पाण्याला ***** फार २८) याच्यावर भाकरी भाजतात ३०) विजय, यश ३२) एक उत्साहवर्धक पेय, टी ३४) हाताच्या या भागावर घड्याळ बांधतात ३६) सोने खरेदी विक्री करणारा ३८) तोंड, मुख ३९) शिवरायांची पहिली राजधानी ४१) परिमळ, सुगंध ४३) बोझा, वेट (मराठीत) ४६) वालज उलट लिहा ४७) युध्दात तोफांचा मारा करण्यासाठी वापरला जाणारा ४८) दुर्ग, किल्ला

## सुडोकु - 209

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 2 | 9 | | | 3 | | | |
| 3 | 7 | | 1 | | | 9 | | |
| | | | 2 | 9 | | 3 | | |
| 8 | 3 | | | 1 | | 4 | | 6 |
| | | | 8 | | | 7 | 5 | |
| 7 | 4 | 5 | 9 | 3 | | | 1 | |
| 9 | | | 7 | | | | 3 | 1 |
| 2 | 5 | 7 | | | | 6 | | |
| 6 | | 3 | | | 9 | 8 | | 7 |


## Classified - छोटी जाहीरात

### विकणे आहे

- सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अ‍ॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्अ‍ॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

